International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

# महिला सुरक्षा आणि सबलीकरण

सौ.विजयमाला महादेव सूर्यवंशी
सहाय्यक शिक्षिका
गोविंदराव हायस्कूल इचलकरंजी
B.Sc.,B.Ed.,M.Ed.,D.S.M.
ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

## प्रास्ताविक :-

**यत्र नार्यस्तु पूज्य ते रमंते तत्र देवताः**

अर्थात जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तिथे देवता वास करतात. असे आपल्या आद्यग्रंथांमध्ये स्त्रियांचे महत्त्व सांगितलेले आहे.भारत हा नवदुर्गेची पूजा करणारा, स्त्री शक्तीचा देश आहे.धनाची देवता असलेली लक्ष्मी, विद्या देणारी सरस्वती,तर दृष्टांचा नाश करणारी दुर्गा अशा विविध देवतांचा अंश प्रत्येक स्त्रीमध्ये असतो.राजमाता जिजाऊ होत्या म्हणून संस्कारमूर्ती कीर्तीवंत छत्रपती शिवराय घडले. सावित्रीबाई फुले यांची साथ मिळाली म्हणून ज्योतिबा फुले महात्मा झाले. आणि म्हणूनच

ज्याला स्त्री आई म्हणून कळली, तो जिजाऊंचा शिवबा झाला.

ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली, तो मुक्ताईचा ज्ञानेश्वर झाला.

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
ISSN: 2457-0362
www.ijarst.in

ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली, तो राधेचा श्याम झाला.आणि
ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली, तो सीतेचा राम झाला.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्रीचा सहभाग असतो. समाजात घडलेले अनेक महापुरुष हे स्त्रीमुळेच घडले आहेत.प्रत्येक यशस्वी व महान व्यक्तीच्या जीवनात स्त्रियांचा सिंहाचा वाटा असतो. हे आपल्याला मान्य करावेच लागेल.स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात की, जनतेला जागृत करण्यासाठी सर्वप्रथम महिलांनी जागृत होणे गरजेचे आहे. तिने एकदा पाऊल टाकले की, कुटुंब पुढे सरकते,गाव पुढे सरकते,आणि देश विकासाकडे जातो. 21 व्या शतकात आधुनिकतेचे वारे वाहत असताना देखील स्त्रिया सर्वच क्षेत्रात प्रगती करीत असल्या तरी आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वप्रथम समाजातील बालविवाह,हुंडाप्रथा,निरक्षरता,लैंगिक अत्याचार, बलात्कार, असमानता,स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवरील घरगुती हिंसाचार, यासारख्या महिलांच्या हक्क व मूल्यांचा घात करणाऱ्या सर्व राक्षसी विचारसरणीचा नाश करणे आवश्यक आहे.त्याशिवाय खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले असे म्हणता येणार नाही. भारतात पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान निर्माण करून त्यांना चूल आणि मूल यात गोवलेले आहे. यामुळे त्यांचा विकास झालेला नाही. ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये याची गंभीरता आजही दिसून येते. महिलांच्या विकासाशिवाय संपूर्ण मानव

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362

**जातीचा विकास होऊ शकत नाही. तसेच महिलांच्या विकासाशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. आणि यातूनच महिला सक्षमीकरणाची संकल्पना पुढे आली आहे.**

**दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाचा आधारस्तंभ बनलेली आहे. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती ती अत्यंत कुशलतेने निभावत असते.स्त्रियांमध्ये सहनशीलता, नाविन्यता, सौंदर्य, बचतवृत्ती, स्मरणशक्ती हे गुण निसर्गतः अधिक प्रमाणात आहेत. स्त्रियांना निसर्गाने निर्मितीचा अधिकार दिला आहे. अर्थात नवनिर्मितीची क्षमता ही एक नैसर्गिक देणगी स्त्रीला लाभलेली आहे.पण तरीही जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून स्त्रीकडे दुर्लक्ष होताना दिसते. महिला मोठ्या प्रमाणात सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थिक परावलंबित्व, हुंडाबळी, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या, घरगुती हिंसाचार आणि अन्य सामाजिक अत्याचारांच्या बळी पडताना दिसून येतात,**

**गतवर्षी आपण आजादी का अमृत महोत्सव साजरा केला अर्थात भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाली. पण तरीही भारतीय समाजातील एक मोठा घटक असलेल्या महिलांना अजून स्वातंत्र्याचा पूर्णपणे लाभ मिळालेला नाही. महिलांच्या संरक्षणासाठी व**

International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362
IJARST

सबलीकरणासाठी शासनाने आज पर्यंत अनेक कायदे केले पण म्हणून महिलांवर विविध प्रकारे अन्याय होत असताना दिसून येतात. त्यामुळे महिलांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.राष्ट्राच्या विकासात महिलांचे महत्त्व आणि अधिकार याबद्दल समाजात जागरूकता आणण्यासाठी मातृदिन, आंतरराष्ट्रीय महिला दिन बालिका दिन,साजरे करण्याची आज गरज भासत आहे.

## महिला सक्षमीकरणाचा अर्थ :-

- स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते कारण मानव जातीचे अस्तित्व स्त्रीपासून आहे. त्यामुळे निर्मितीच्या शक्तीचा विकास करण्यासाठी स्त्रीला सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक, राजकीय, व्यावसायिक, या सर्व क्षेत्रात संधीची समानता प्रदान करणे म्हणजे महिला सक्षमीकरण असे म्हणता येईल.
- दुसऱ्या शब्दात महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे जेणेकरून त्यांना शिक्षण,रोजगार व आर्थिक प्रगतीच्या समान संधी मिळतील. ज्यामुळे स्त्रिया पुरुषांप्रमाणे त्यांच्या प्रत्येक गरजा व आशाआकांक्षा पूर्ण करू शकतील.
- ज्यावेळी स्त्री तिच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक निर्णय स्वतः घेऊ शकेल. त्यावेळी महिलांचे सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल.

## महिला सक्षमीकरणाची गरज :-

स्त्रिया सर्वच क्षेत्रात प्रगती करीत असल्या, तरी आजही स्त्रियांवरील बलात्कार, विनयभंग, ऍसिड हल्ला, हुंडाबळी, कौटुंबिक छळाच्या घटना, गरोदरपण,बाळंतपण, कामाचा अतिताण, पुरुषी वर्चस्व यातून होणाऱ्या मानसिक त्रासामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यासाठी स्त्रीला भावनिक, मानसिक, नैतिक आधाराबरोबर योग्य समुपदेशन व पुनर्वसन तसेच कायद्याचे संरक्षण याची अत्यंत गरज आहे.आधुनिक युगात अनेक स्त्रिया विविध क्षेत्रात भरारी घेत असल्या तरीही

- सामान्य ग्रामीण महिला अजूनही चूल आणि मूल यातच अडकून राहिलेली आहे.
- पुरुषांपेक्षा महिला शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे.
- शहरी भागातील महिला ग्रामीण भागातील महिलांपेक्षा अधिक रोजगारक्षम आहेत.
- मालमत्तेवर संपत्तीवर घरातील पुरुष सदस्यांचे नाव असते.
- घरची कामे करून स्त्रियांना नोकरीची जबाबदारी पूर्ण करावी लागते.
- स्वतःच्याच मिळकतीवर महिलांचा हक्क नसतो.
- आपण कमावलेले पैसे स्वतः खर्च करण्याचा स्त्रियांना अधिकार नसतो.
- महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे.
- महिलांना आरोग्य व सुरक्षिततेच्या सुविधा पुरविणे.

- महिलांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देणे.
- महिलांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक या सर्व क्षेत्रात संधीची समानता प्रदान करणे.

## महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील अडथळे :-

21 व्या शतकात वावरत असताना अजूनही काही समाजामध्ये महिलांना घराबाहेर पडण्यास बंदी घातली जाते. त्यामुळे शिक्षण घेऊनही बऱ्याच स्त्रिया केवळ घर,संसार आणि मूल सांभाळण्याची भूमिका पार पाडताना दिसून येतात.

- कामाच्या ठिकाणी महिलांवरील हिंसाचार व अत्याचाराचे प्रमाण अलीकडे खूपच वाढलेले दिसून येते.
- रोजंदारीवर काम करणाऱ्या महिलांना पुरुषांपेक्षा कमी पगार दिला जातो.
- नोकरदार महिला आज देखील रात्री उशिरा सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा वापर करताना असुरक्षित आहेत.

  त्यामुळे महिलांना सुरक्षितता मिळाल्याशिवाय खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण होऊ शकणार नाही.
- स्त्रीभ्रूण हत्या किंवा गर्भपात हा देखील महिला सक्षमीकरणात अडथळा आणणारा एक प्रमुख घटक आहे. अनेक सोनोग्राफी सेंटरमध्ये येथे लिंगनिदान चाचणी केली जात नाही. अशा सूचनांचे

फलक पाहायला मिळतात. पण अजूनही स्त्रीभ्रूणहत्येचे समूळ उच्चाटन झालेले दिसून येत नाही.

## महिला सक्षमीकरणासाठी सरकारची भूमिका :-

महिला व बालकल्याण विभागामार्फत भारत सरकारकडून अनेक योजना राबविल्या जातात.

- **बेटी बचाओ बेटी पढाओ : 02-11-2015**

मुलगी ही ओझं आहे असं समजणाऱ्यांची विचारसरणी बदलण्याच्या हेतूने तसेच स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी, मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत देणारी योजना. उज्वला योजना

- **सुकन्या समृद्धी योजना : 22-01-2015**

मुलींचे शिक्षण व विवाह यासाठी केवळ 10 वर्षाखालील मुली या योजनेचा लाभ घेऊ शकतात.मुलीचे वय 21 वर्षे होईपर्यंत दरवर्षी किमान 250 रुपये किंवा जास्तीत जास्त 1.5 लाखापर्यंत रक्कम भरून गुंतवणूक केली पाहिजे.

- **माझी कन्या भाग्यश्री : 01-08-2017**

मुलींचा जन्मदिन वाढविणे. लिंग निवडीस प्रतिबंध करणे.

मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन देणे .मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे.

कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 7.5 लाखापर्यंत

एका मुलीनंतर कुटुंब नियोजन- मुलीच्या नावे 50000 रुपये

दोन मुली नंतर कुटुंब नियोजन-प्रत्येक मुलीच्या नावे 25000 रुपये

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362

➢ **जननी सुरक्षा योजना : 26-10-2005**

अनुसूचित जाती व जमातीतील तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील गर्भवती महिला व माता यांच्या आरोग्यदायी जीवनासाठी मोफत प्रसुती सेवा व आर्थिक सहाय्य दिले जाते.

➢ **प्रधानमंत्री मातृवंदना योजना : 01-01-2017**

आर्थिक आणि सामाजिक अडचणीमुळे गरोदरपणाच्या शेवटच्या दिवसात ही अनेक स्त्रिया कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करत असतात. अनेक स्त्रिया बाळाला जन्म दिल्यानंतर वेळेआधीच कामाला लागतात. आणि त्यांचे शरीर त्यासाठी तयार होत नाही अशा परिस्थितीत महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेता येत नाही. जेणेकरून गरोदरपणात त्यांच्या आरोग्याची काळजी घेता यावी.यासाठी

गरोदर महिला आणि स्तनदा महिलांना 6000 रुपयांची आर्थिक मदत

➢ **महिला बचत गट योजना :**

महिला बचत गटाचे सक्षमीकरण करणे.

व्यवसाय करत असलेल्या महिला बचत गटात अर्थसहाय्य देणे.

➢ **विधवा पेन्शन योजना :**

वार्षिक उत्पन्न 21 हजार रुपये पेक्षा जास्त नसलेल्या 65 वर्षाच्या आतील महिलांना दरमहा 600 रुपये पेन्शन योजना अंतर्गत दिली जाते.

➢ **अस्मिता योजना : 08-03-2018**

International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
IJARST
ISSN: 2457-0362

**योग्य किंमतीत विद्यार्थिनी व महिलांना सॅनिटरी नॅपकिन विकत घेणे शक्य व्हावे म्हणून बचत गटामार्फत चालवली जाणारी योजना.**

- **उज्वला योजना : 01-05-2016**

**कुटुंबातील महिलेच्या नावावर या योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन दिले जाते.**

- **मनोधैर्य योजना**

**बलात्कार पीडित, अॅसिड हल्ल्यात जखमी झालेल्या अन्यायग्रस्त महिलांचे मनोधैर्य वाढवून त्यांना पुन्हा नव्याने उभारी देण्यासाठी राबवलेली योजना.**

## महिला सक्षमीकरणासाठी संसदेने केलेले कायदे :-

- **हुंडा प्रतिबंधक कायदा 1961**

  **या कायद्यान्वये हुंडा मागणे आणि हुंडा देणे हे गुन्हे आहेत. हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेमध्ये ३०४ ब आणि 498 अ ही नवीन कलमे अंतर्भूत आहेत.**

- **समान वेतन कायदा 1976**

  **एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांनाही समान वेतन मिळाले पाहिजे विशिष्ट कार्यक्षेत्रातील नोकऱ्या सोडता अन्य ठिकाणी स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी मोबदला दिला जातो.**

- **लिंगनिदान प्रतिबंधक कायदा 1994**

International Journal For Advanced Research
In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362

स्त्रीभ्रूणहत्या रोखणे व गर्भाचे लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा दुरुपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान करण्यास या कायद्यानुसार बंदी आणण्यात आली आहे.

➢ **कौटुंबिक छळ प्रतिबंधक कायदा 2005**

कुटुंबामध्ये महिलेचा शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, लैंगिक अपरा मानसिक किंवा आर्थिक छळ होत असेल तर ती या कायद्याअंतर्गत दाद मागू शकते.

➢ **बालविवाह प्रतिबंधक कायदा 2006**

लग्नाच्या वेळी मुलीचे वय 18 वर्षे आणि मुलाचे वय 21 वर्षापेक्षा कमी असल्यास या कायद्यानुसार शिक्षेची तरतूद केलेली आहे हा कायदा सर्व जाती धर्माच्या लोकांना सारखाच लागू आहे.

➢ POCSO Act-2012

**लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण कायदा-2012**

- बालकाचे योग्य प्रकारे पालन पोषण व संवर्धन व्हावे.
- बालकाचा निकोप शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास व्हावा.
- बालकाला अत्याचारापासून संरक्षण मिळावे.
- बालक सुदृढ राहावे.
- बालकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे.
- बालकाचे बालपण व यौवन यांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण

IJARST International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

व्हावे.

➢ **कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा-2013**

सरकारी किंवा खाजगी संस्थेत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्यासाठी हा कायदा केलेला आहे.

➢ **मुलावर हक्क**

एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वत:जवळ ठेवू शकते, मात्र पाच वर्षाहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णय बंधनकारक असतो.

➢ **प्रसूती सुविधा कायदा**

नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी प्रसूती रजेची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी बाल संगोपन रजेची तरतूद असून त्या काळातील विशिष्ट दिवसाची भर पगारी रजा मिळते. गर्भपात झाल्यावर तिला भरपगारी रजा मिळण्याची तरतूद कायद्यात केलेली आहे.

## महिला सक्षमीकरणाचे फायदे :-

- महिला आरक्षण
- प्रत्येक कामात स्त्रियांचा सक्रिय सहभाग वाढलेला दिसून येतो.
- स्त्रिया त्यांच्या हक्कासाठी लढू लागले आहेत.
- स्त्रिया हळूहळू स्वावलंबी बनत आहेत.

International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

- पुरुष आता स्त्रियांच्या निर्णयाचा आदर करत आहेत.

## राष्ट्र उभारणीत महिलांची भूमिका :-

आज समाजातील महिला जागरूक झाल्या आहेत, घर - संसार सांभाळून आजची आधुनिक युगातील स्त्री सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेताना दिसत आहे. देशातील लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्मी लोकसंख्या ही महिला आहे. त्यामुळे राष्ट्राच्या विकासात महिलांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आज भारताच्या राष्ट्रपती पदावर ही एक आदिवासी महिला शिक्षिका आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. पंतप्रधान,अंतराळवीर, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील या सर्वच क्षेत्रात अनेक स्त्रिया महत्त्वाचे योगदान देत आहेत. तरी आजही अनेक महिलांना शिक्षण, सुरक्षित प्रवास, सुरक्षित काम,याठिकाणी त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी नारीशक्तीने एकत्र येऊन तिच्यावर लादलेली बंधने तोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला रोखू शकणार नाही. आपणच याची सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी सर्वप्रथम महिलांनीच महिलांचा आदर केला पाहिजे. त्यांना प्रगतीची संधी दिली पाहिजे.

घरगुती कामे आणि मुलांचे संगोपन यात अडकून पडल्यामुळे स्त्रियांमध्ये विविध गुण व कौशल्य असूनही त्यामागे राहतात. व आयुष्याच्या शेवटी वेळ निघून गेल्यावर आपण काहीच करू शकलो नाही. म्हणून पश्चाताप करत

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362

बसतात. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा प्रत्येक स्त्रीने स्वतःला सादर करायला शिकले पाहिजे. कारण संधीही आपले दार एकदाच ठोठावत असते, तुम्ही जर दार उघडले नाही तर ती पुढे दुसऱ्याचे दार ठोठावते. आणि म्हणून आलेली संधी कधीच सोडू नका.

## समारोप :-

समाजरूपी रथ विकासाकडे न्यायचा असेल तर पुरुषरुपी चाकाबरोबर स्त्रीरुपी चाकालाही विकासाची तेवढीच संधी मिळणे गरजेचे आहे.

संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिलेला असला तरी भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे यातून तिला मुक्त करणे गरजेचे आहे.

**सक्षम नारी सक्षम भारत** हे कल्पनेतील चित्र वास्तवात आणण्यासाठी, प्रत्येक स्त्रीने वैयक्तिक पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी

- प्रत्येक स्त्रीने स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे.
- प्रत्येक स्त्रीने स्वतःमध्ये विश्वास निर्माण केला पाहिजे.
- छोट्या-मोठ्या निर्णयासाठी इतरांवर विसंबून राहू नये.
- कुटुंबातील व समाजातील छोटे-मोठे निर्णय स्वतः घेतले पाहिजे.
- स्त्रीवादी उपेक्षा प्रदान वक्तव्यावर आक्षेप घेण्याचे धाडस केले पाहिजे.
- प्रत्येक स्त्रीने आपले धाडस दाखवले पाहिजे.
- प्रत्येक स्त्रीने आपली ओळख निर्माण करणे गरजेचे आहे.

International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362
IJARST

पण आपली ही ओळख निर्माण करताना आपल्याला शासनाने दिलेले हक्क,अधिकार, कायदे, आपल्या आई-वडिलांनी दिलेले स्वातंत्र्य याचा गैरफायदा न घेता आपल्या आई-वडिलांनी जो विश्वास आपल्यावर संपादन केलेला आहे त्या विश्वासास तडा जाऊ देऊ नये एवढीच अपेक्षा.

## संदर्भसूची :-


- प्रा.डॉ.सौ.रेखा हिंगोले (2006) महिला सबलीकरण समस्या व उपाय,लातूर, इशा प्रकाशन.
- मीना केळकर(1990) भारतीय स्त्री संकल्पना आणि प्रतिमा,पुणे,नितीन प्रकाशन.
- शिक्षण आणि समाज त्रैमासिक एप्रिल जून 2006

**Websides**

- https://mr.m.wikipedia.org
- https://www.maharashrta.gov.in
- https://womenchild.maharashrta.gov.in
- https://mscw.org.in